**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,**

**मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.**

# जाहीर प्रकटन,

## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२६

शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. यावर्षी संपूर्ण राज्यात इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश सर्वप्रथम करण्यात येत आहेत. वेळापत्रकाप्रमाणे दिनांक २६ जून २०२५ ला विद्यार्थ्यांना व शाळा महाविद्यालयांना पहिल्या फेरीतील प्रवेश यादी जाहीर करणे निश्चित करण्यात आले होते. परंतू शासन शुध्दीपत्रक क्रमांक : प्रवेश १२२५/प्र.क्र.-१६/एसडी-२ दिनांक २३ जून २०२५ रोजीला अन्वये मा.न्यायालय निर्णयाप्रमाणे इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अल्पसंख्यांक समुदायाच्या शाळा महाविद्यालय मधील एकूण प्रवेश क्षमतेमधील प्रवेशाबाबत फेरबदल करणे अपेक्षित आहे असे असताना काही मा.न्यायालयीन प्रकरणे व तांत्रिक बाबींमुळे प्रवेश प्रक्रियेमधील दिनांक २६ जून २०२५ ला जाहीर करण्यात येणाऱ्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय संलग्न उच्च माध्यमिक शाळांच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थी प्रवेश याद्या जाहीर करता येणार नाहीत. संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करुन पारदर्शक व निकोप पध्दतीने प्रवेश प्रक्रिया होण्यासाठी पुढील प्रमाणे सुधारित वेळापत्रक पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | नियमित फेरी एक मधील कॅप व कोटाअंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी कार्यवाही |
|---|---|---|
| १ | ३० जून २०२५ | विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार प्रवेश यादी जाहीर करणे. |
| २ | ०१ जुलै २०२५ ते ०७ जुलै २०२५ | विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे. |
| ३ | ०९ जुलै २०२५ | दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे. |

उपरोक्त बदलाची इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ठ असणाऱ्या सर्व कनिष्ठ महाविद्यलायांचे प्राचार्य, विद्यार्थी /पालक यांनी नोंद घ्यावी. या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल-** https://mahafyjcadmissions.in

**ई-मेल आयडी –** support@mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळः** पुणे
**दिनांकः** २६ जून, २०२५

## शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे

### इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकिया २०२५-२६ नियमित फेरी -१ अंतर्गत पुढील टप्पे

| अ.क्र. | CAP प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण सूचना | दिनांक | Quota प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण सूचना | |
|---|---|---|---|---|
| १ | • नियमित फेरी-१ साठी **Allotment** पोर्टलवर जाहीर करणे.<br>• **Student & College** लॉगीनमध्ये तपशील दर्शविणे.<br>• विद्यार्थ्यांना **SMS** व्दारे संदेश पाठविणे.<br>• **Display of cut-off list for the Admission Round.** | ३०/०६/२०२५ | . **कोटांतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांच्या लॉगीनमध्ये दर्शविणे. (इन-हाऊस, व्यवस्थापन, अल्पसंख्यांक कोटा)**<br>. **विद्यालयांनी प्रवेशासाठी कोटानिहाय गुणवत्ता यादी/निवड यादी दर्शनी भागात प्रसिध्द करणे.** | यादी |
| २ | • **विद्यार्थ्यांनी आपणाला मिळालेल्या विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.**<br>• **<u>Proceed for Admission by students</u>**<br>(Students to check their login for allotment details, upload remaining documnets and proceed with admission to the allotted Junior College)<br>(प्रवेशासाठी विद्यालय न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीमध्ये पुन्हा पसंतीक्रम देण्याची संधी मिळेल.)<br>• **Admit/Reject/Cancel by Jr. College**<br>(विद्यालयांनी आपल्या विद्यालयात प्रवेशासाठी Allot झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जातील संपूर्ण तपशील व कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावते. विनंतीनुसार झालेले प्रवेश रद्द करता येतील.) | ०१/०७/२०२५ ते ०७/०७/२०२५ | • **विद्यालयांनी प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना संपर्क करणे.**<br>(विद्यालयांनी कोटांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची निवड झालेबाबत व या कालावधीत प्रवेशास येणेबाबत कळवावे.)<br>• **विद्यार्थ्यांनी कोटांतर्गत प्रवेश निश्चित करणे.**<br>(संबंधित कोटांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.)<br>• **विद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे कोटांतर्गत प्रवेश निश्चित करणे.**<br>(विद्यालयांनी आपल्या विद्यालयात कोटांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जातील संपूर्ण तपशील व कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावेत.) | प्रवेश |
| ३ | **रिक्त जागा प्रदर्शित करणे. (Vacancy)** | ०९/०७/२०२५ | | |

**टीप-वरील वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यवाही शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व विद्यार्थ्यांनी वेळेत पूर्ण करावी.**

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

स्थळ: पुणे
दिनांक: २६ जून, २०२५